# ‘आम्ही खार्ग बेटाचा ताबा घेऊ’, डोनाल्ड ट्रम्प यांची इराणला मोठी धमकी



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™



पान 3 वरुन...

नाले अतिक्रमणमुक्तीचा फज्जा; सर्वेक्षणावर लाखो खर्च

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 12 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## भारतीय खलाशी असलेल्या दोन जहाजांवर हल्ला ; हॉर्मुझ बंद

# अमेरिका-इराण युद्ध पुन्हा पेटलं.!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**पश्चिम आशियात अमेरिका व इराण यांच्यात पुन्हा एकदा संघर्ष सुरू झाला आहे. या संघर्ष दरम्यान मागील तीन दिवसांत भारतीय खलाशी असलेल्या दोन जहाजांना अमेरिकेने लक्ष्य केले आहे. ओमानच्या समुद्रात जहाजांवर हल्ले करण्यात आले. बुधवारी (१० जून) अमेरिकेने २४ भारतीय खलाशी असलेल्या ‘टँकर सेटेबेल्लो’ या जहाजावर हल्ला केला होता.**

या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर २१ जणांना ओमानच्या हवाई दलाने वाचवले आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत माहिती दिली. या हल्ल्याच्या दोन दिवसांपूर्वी ‘मॅरिव्हेक्स’ या जहाजावर हल्ला करण्यात आला होता. ‘मॅरिव्हेक्स’ जहाजावर असलेल्या २४ भारतीय खलाशांना सुखरूप वाचवण्यात आले होते.

व्यावसायिक जहाजांवर होत असलेल्या हल्ल्यांबाबत भारताने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघातील भारताचे कायमस्वरूपी प्रतिनिधी पी. हरीश म्हणाले, या हल्ल्यांमध्ये अनेक भारतीय नागरिकांनी प्राण गमावले आहेत. तर काही जण बेपत्ता आहेत. भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि हित आमच्यासाठी सर्वतोपरी आहे, असे हरीश म्हणाले. ओमानच्या किनारपट्टी जवळ असलेल्या ‘सेटेबेल्लो’ या व्यावसायिक जहाजावर केलेल्या हल्ल्याचा व्हिडिओ अमेरिकेने पोस्ट केला आहे. व्यावसायिक जहाजांवर झालेल्या हल्ल्याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अभिमान व्यक्त केला आहे.

दरम्यान, भारताने अमेरिकेच्या दिल्लीतील वरिष्ठ दूतांना हल्ल्याचा निषेध करत समन्स बजावले होते. त्यानंतर ट्रम्प यांची प्रतिक्रिया समोर आली आहे.



### सेटेबेल्लो टँकरवर हल्ला कसा झाला?

अमेरिकेने सेटेबेल्लो ऑइल टँकर जहाजाच्या थेट इंजिन रूमवर हल्ला केला. त्यावेळी जहाज होर्मुझ सामुद्रधुनीच्या जवळ व ओमानच्या आखातात होते. या हल्ल्यानंतर जहाजात आग लागली. अमेरिकेच्या यूएस सेंट्रल कमांडने ‘एक्स’वर एक पोस्ट शेअर करून हल्ला केल्याची माहिती दिली. अमेरिकन नौदलाची नाकाबंदी भेदल्यामुळे ओमानच्या आखातात एका ऑइल टँकरवर हल्ला केल्याची माहिती अमेरिकन लष्कराने दिली.

### जहाजावर हल्ला कसा झाला?

ओमानच्या आखातात सोमवारी (८ जून) २४ भारतीय खलाशी असलेल्या व पलाऊ या देशाचा ध्वज लावलेल्या ‘एमटी मॅरिव्हेक्स’ या तेलवाहू जहाजाला भीषण आग लागली. काही तासांनंतर ओमान हवाई दलाच्या हेलिकॉप्टरद्वारे जहाजावरील सर्व कर्मचाऱ्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. मस्कत मधील भारतीय दूतावासाने सोशल मीडिया पोस्टद्वारे सर्व २४ भारतीय कर्मचाऱ्यांची सुटका केल्याबद्दल ओमानच्या अधिकाऱ्यांचे आभार मानले. मॅरिव्हेक्सच्या कर्मचाऱ्यांनी पाठवलेल्या आपत्कालीन संदेशाच्या ऑडिओ रेकॉर्डिंगमध्ये जहाजावरील एक कर्मचारी असे म्हणताना ऐकू येत आहे की, इंजिन रूमवर अमेरिकन नौदलाच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर जहाजाला आग लागली. हिंदूस्तान टाइम्सने दिलेल्या वृत्तानुसार, “मॅरिव्हेक्स हे जहाज भारताच्या मालकीचे नाही. गेल्या काही दिवसांत या जहाजाने इराणी बंदरांवरील अमेरिकेची नाकेबंदी चुकवण्याचे चार प्रयत्न केले. तीन प्रसंगी, अमेरिकन नौदलाने वारंवार दिलेल्या इशाऱ्यांनंतर हे जहाज मागे फिरले होते.” सूत्रांनी सांगितले की, मॅरिव्हेक्सने सोमवारी (८ जून) ओमानच्या जलसीमेतून प्रवास करून अमेरिकेची नाकेबंदी चुकवण्याचा चौथा प्रयत्न केला. पकडले जाणे टाळण्यासाठी जहाजाने आपली ट्रॅकिंग उपकरणे बंद केली होती.

### भारताकडून तीव्र निषेध

या घटनेनंतर भारताने बुधवारी (१० जून) अमेरिकेचे प्रभारी राजदूत जेसन मीक्स यांना समन्स बजावले. ओमानच्या किनारपट्टीवर ‘सेटेबेल्लो’ या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याचा तीव्र निषेध केला. परराष्ट्र मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव नागराज नायडू यांनी मीक्स यांना समन्स बजावले आणि आखाती प्रदेशात वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर या हल्ल्याबाबत चिंता व्यक्त केली.

### अमेरिकेने जबाबदारी स्वीकारली

८ जून रोजी सेंटकॉमने मॅरिव्हेक्स जहाजावरील हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. 'यूएसएस अब्राहम लिंकन'वरील एफ/ए-१८ सुपर हॉर्नेट विमानाने जहाजाच्या नियंत्रण कक्षावर अचूक हल्ला केल्याचा दावा करण्यात आला. अमेरिकेच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून जहाज इराणी बंदराच्या दिशेने जात असल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे सेंटकॉमने म्हटले आहे. हल्ल्यात जहाज निकामी झाले, मात्र बुडाले नाही.

# पुण्यानंतर कॉक्रोच पार्टीची देशात कुठे आंदोलने?

## पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ पुण्यात 'कॉक्रोच जनता पार्टी'तर्फे भव्य शांततापूर्ण आंदोलन

**महाईन्यूज । पुणे**

**देशात जेव्हा जेव्हा आंदोलने झाली तेव्हा तेव्हा आंदोलनकर्त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यात आला. आपण आंदोलनाच्या माध्यमातूनच स्वतंत्र झालो आहोत. लोकशाहीमध्ये आंदोलने महत्त्वाची आहेत. आम्हाला 'फेक' म्हणण्यापेक्षा व्यक्त होणाऱ्या तरुणांचे म्हणणे समजून घ्यावे. मात्र हे सरकार त्याबाबत चर्चात करच नाही, अशी माहिती 'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजित दिपके यांनी आज दिली.**



पुणे हे शिक्षणाचे माहेरघर असल्याने या आंदोलनाची पुण्यातून सुरुवात करून भविष्यात नागपूर, लखनऊ आणि बेंगळुरू येथेही आंदोलने केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

'नीट', सीबीएसईसह विविध राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांच्या पेपरफुटी प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देण्याच्या या मागणीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात आज ( ११ जून) दुपारी ४ वाजल्यापासून शांततापूर्ण आंदोलन करण्यात येणार आहे. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे देखील आंदोलनात सहभागी होणार आहेत. या आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंबर चौधरी, ॲड. असीम सरोदे, माहिती अधिकार कार्यकर्ता विजय कुंभार यांनी पाठिंबा दिला.

देशभरातील एक कोटीहून अधिक विद्यार्थ्यांवर परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे अन्याय झाला आहे. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी रस्त्यावर उतरत आहोत. सरकारशी चर्चा करण्याचीही तयारी आहे. मात्र, आमची भूमिका आणि विचार समाजमाध्यमांवरून दडपण्याचा प्रयत्न होत आहे,' असा आरोप दिपके यांनी केला. आमच्याबरोबर धोरणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, अभ्यासक मंडळी आहेत. त्यामुळे शिक्षणातील प्रश्नांबाबत सविस्तर अभ्यास करून पुढील दिशा ठरवली जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

डॉ. चौधरी म्हणाले, ' दिपके यांनी सुरू केलेले आंदोलन गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अहिंसक विचारांवर आधारित आहे. लोकशाही वाचवण्यासाठी जनआंदोलनाशिवाय पर्याय नाही. त्याबरोबरच अशा आंदोलनांची विश्वासार्हता निर्माण होणे गरजेचे आहे.'

सरकारने या प्रश्नावर संवेदनशीलतेने प्रतिसाद देण्याची गरज ॲड. सरोदे यांनी व्यक्त केली. 'परीक्षांमधील गैरव्यवस्थांमुळे विद्यार्थ्यांचे जीव जात असताना सरकार गंभीरपणे प्रतिसाद देताना दिसत नाही. चुका मान्य करून माफी मागण्याची प्रवृत्ती सत्ताधाऱ्यांमध्ये दिसून येत नाही,' अशी टीका त्यांनी केली.

### 10 हजारांची भरपाई

अभिजीत दिपके म्हणाले की, संविधान हातात घेणे किंवा 'जय भीम'च्या घोषणा देणे अराजकतेचे लक्षण कसे ठरू शकते? संविधानात बहुमत नसताना शपथ घेण्याची तरतूद कुठे आहे ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. याशिवाय त्यांनी परीक्षा व्यवस्थेतील सुधारणा करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या. पेपरफुटी झाल्यास संबंधित विद्यार्थ्यांना किमान 10 हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, परीक्षा पुढे ढकलल्यास किंवा रद्द झाल्यास विद्यार्थ्यांचा झालेला खर्च सरकारने भरून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

# जिम मालकावर तीन गोळ्या झाडल्या; कोयत्यानेही वार! जुन्या वादातून हल्ला

**महाईन्यूज । पुणे**

**सहकारनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तळजाई डोंगर परिसरात बुधवारी रात्री थरारक गोळीबाराची घटना घडली. यामध्ये जिम मालक व ट्रेनर असलेल्या तरुणावर चौघांनी पाठलाग करून तीन गोळ्या झाडल्या. त्यानंतर कोयत्यानेही हल्ला करण्यात आला. मात्र गोळ्या लक्ष्यावर न लागल्याने त्याचा जीव वाचला. याप्रकरणी पोलिसांनी तीन अल्पवयीन मुलांसह चौघांना ताब्यात घेतले आहे.**




योगेश बनेकर (वय ३४, रा. धनकवडी) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी आदित्य थोपटे आणि त्याच्या तीन अल्पवयीन साथीदारांविरुद्ध सहकारनगर पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, योगेश बनेकर यांचा बिबवेवाडी परिसरात जिम व्यवसाय आहे. सुमारे तीन महिन्यांपूर्वी धनकवडी भागात वाहन पार्किंगवरून योगेश आणि आरोपींमध्ये वाद झाला होता. त्यावेळी झालेल्या शिवीगाळीचा राग आरोपींच्या मनात होता. त्यातूनच हा हल्ला घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

बुधवारी (दि. १०) रात्री योगेश जिम बंद करून घरी निघाले होते. तळजाई डोंगराजवळील बिकानेर चौकात फळे घेण्यासाठी ते थांबले असताना दुचाकीवरून आलेल्या चौघांनी त्यांच्यावर अचानक गोळीबार केला. पहिली गोळी त्यांच्या मानेजवळून गेली. गोळीबार होताच परिसरात एकच गोंधळ उडाला. योगेश यांनी जीव वाचवण्यासाठी धाव घेतली.

मात्र आरोपींनी त्यांचा पाठलाग सुरूच ठेवला. पाठलागादरम्यान आरोपींनी आणखी दोन गोळ्या झाडल्या. दोन्ही गोळ्या मात्र चुकल्या. त्यानंतर एका आरोपीने योगेश यांच्यावर कोयत्याने वार केला. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. रक्तबंबाळ अवस्थेतही त्यांनी जीव वाचवण्यासाठी प्रयत्न केल्याने मोठा अनर्थ टळला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे काही तासांतच आरोपींना ताब्यात घेण्यात आले.

या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमी योगेश बनेकर यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा अधिक तपास सहकारनगर पोलिस करत असून हल्ल्यात वापरण्यात आलेले शस्त्र जप्त करण्यासह गुन्ह्यामागील इतर कारणांचाही तपास सुरू आहे.

### २ पिस्तूल, ६ गोळ्या आणि कोयता जप्त

आरोपींकडे दोन पिस्तुले, सहा जिवंत काडतुसे आणि एक कोयता असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यापैकी तीन गोळ्या योगेश बनेकर यांच्यावर झाडण्यात आल्या, तर उर्वरित तीन काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. ही पिस्तुले आरोपींनी कुठून मिळवली, त्यामागे कोणते मोठे रॅकेट आहे का, याचा तपास सहकारनगर पोलिसांकडून सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपींचे गुन्हेगारी रेकॉर्ड तसेच त्यांचे इतर गुन्हेगारी टोळ्यांशी काही संबंध आहेत का, याचाही पोलिसांकडून सखोल तपास केला जात आहे.

# नाले अतिक्रमणमुक्तीचा फज्जा; सर्वेक्षणावर लाखो खर्च

## भूमकर चौक, वाकड, ताथवडे, मोशी, नाशिक फाटा आदी भागांत पाणी तुंबण्याचा धोका

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने दोन वर्षांपूर्वी शहरातील नैसर्गिक नाले आणि ओढ्यांचे सर्वेक्षण करून त्यासाठी लाखो रुपयांचा खर्च केला. मात्र, अद्याप एकही नाला पूर्णपणे अतिक्रमणमुक्त करण्यात प्रशासनाला यश आलेले नाही. परिणामी, यंदाच्या पावसाळ्यातही शहरातील अनेक भागांत पाणी तुंबण्याचा धोका कायम असल्याचे वास्तव समोर आले आहे.**



दरवर्षी पावसाळ्यात शहरातील सखल भाग, गृहनिर्माण सोसायट्या, दुकाने आणि रस्त्यांवर पाणी साचण्याच्या घटना घडतात. गेल्या वर्षीही अनेक ठिकाणी घरे व व्यावसायिक आस्थापनांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. तसेच वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला होता.

महापालिकेच्या ड्रेनेज विभागाने केलेल्या सर्वेक्षणात अनेक नैसर्गिक नाले, ओढे, स्टॉर्म वॉटर लाईन आणि ड्रेनेज मार्गांवर अतिक्रमणे झाल्याचे स्पष्ट झाले होते. काही ठिकाणी नाले पूर्णपणे बुजवून त्यावर बांधकामे करण्यात आल्याचेही निदर्शनास आले. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बाधित होऊन निचरा व्यवस्थेवर ताण वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांनी पहिल्या टप्प्यात आठ प्रमुख नाले अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश दिले होते. क्षेत्रीय कार्यालयांकडून नोटिसा बजावून कारवाई सुरू करण्यात आली; मात्र ती केवळ दिखाऊ स्वरूपाची ठरल्याचा आरोप होत आहे. आजतागायत एकही नाला पूर्णपणे अतिक्रमणमुक्त झालेला नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, शहरातील जुन्या नाल्यांचे आणि ओढ्यांचे नकाशे उपलब्ध नसल्याने कारवाईत अडथळे येत असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. पूर्वी नाल्यांचा प्रवाह, रुंदी आणि मार्ग कसा होता याची अचूक माहिती नसल्याने अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया संथ गतीने सुरू आहे.

भूमकर चौक, पुनावळे, ताथवडे, वाकड, मानकर चौक, कस्पटे कॉर्नर, डांगे चौक, मोशी चौक, नाशिक फाटा, पीसीएमटी चौक, किवळे अंडरपास, सिंबायोसिस अंडरपास, फुगेवाडी, दापोडी, चिंचवड, पिंपरी, आकुर्डी आणि निगडीसह अनेक भागांत दरवर्षी पाणी साचत असल्याचे चित्र कायम आहे.

नागरिकांच्या मते, नाल्यांवरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे समस्या अधिक गंभीर बनली आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी वारंवार नाले अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश दिले असले तरी प्रत्यक्षात ठोस कारवाई होत नसल्याची टीका होत आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या तोंडावर शहरातील पूरस्थितीचा धोका कायम राहिला असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

### नाले अतिक्रमणाच्या विळख्यात

पिंपरी-चिंचवड शहरातील नैसर्गिक नाले आणि ओढ्यांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी महापालिकेने लाखो रुपये खर्च करून सर्वेक्षण केले. मात्र, अद्याप एकही नाला पूर्णपणे अतिक्रमणमुक्त झालेला नाही. त्यामुळे भूमकर चौक, वाकड, ताथवडे, मोशी, नाशिक फाटा, डांगे चौक यांसह अनेक भागांत यंदाही पावसाचे पाणी तुंबण्याचा धोका कायम असून नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त होत आहे.

---

# पिंपरी चिंचवडवर पाणी कपातीची टांगती तलवार

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरावर पाणी कपातीचे संकट गडद होत असून पाटबंधारे विभागाने महापालिकेला १५ टक्के पाणी कपातीची सूचना केली आहे. पवना धरणातील पाणीसाठा २१.८२ टक्क्यांवर, तर आंद्रा धरणातील साठा ३१ टक्क्यांवर घसरल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. याबाबतचा अंतिम निर्णय येत्या पंधरवड्यात घेतला जाणार आहे.**

### ३१ जुलैपर्यंतच साठा पुरणार?

पवना आणि आंद्रा धरणातील पाणीसाठा झपाट्याने घटत असून सध्याचा उपलब्ध साठा ३१ जुलैपर्यंतच पुरेल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. पाऊस आणखी लांबला तर पिंपरी-चिंचवडकरांना १५ टक्के पाणी कपातीला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे पाणी वापरात काटकसर करण्याची गरज निर्माण झाली आहे.



शहराला मुख्यत्वे पवना धरणातून दररोज सुमारे ५५० एमएलडी पाणीपुरवठा केला जातो. याशिवाय आंद्रा धरणातून ९० एमएलडी आणि एमआयडीसीमार्फत ३० एमएलडी पाणी उपलब्ध होते. अशा प्रकारे शहराला दररोज एकूण ६७० एमएलडी पाणी मिळते.

मात्र, यंदा मान्सून उशिरा दाखल झाल्याने आणि वाढत्या उष्णतेमुळे धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. पवना धरणाचे पात्र अनेक ठिकाणी कोरडे पडले असून शेतकरी तेथून गाळ काढत असल्याचे चित्र दिसत आहे. सध्याचा साठा ३१ जुलैपर्यंतच पुरेल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

शहरात २०१८ पासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. त्यातच आता १५ टक्के पाणी कपातीची शक्यता निर्माण झाल्याने नागरिकांच्या चिंतेत भर पडली आहे. पावसाने लवकर हजेरी लावली नाही, तर आगामी काळात आणखी कठोर निर्णय घ्यावे लागू शकतात.

पाणीपुरवठा विभागाचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सध्या कोणतीही कपात केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, पावसाचा अंदाज आणि धरणांतील पाणीसाठ्याचा आढावा घेऊन पुढील १५ दिवसांत निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले. तसेच नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहनही केले आहे.

दरम्यान, पवना धरण शाखेचे अभियंता रजनीश बारिया यांनी पाणीसाठ्यात होत असलेल्या वेगवान घटीमुळे महापालिकेला १५ टक्के पाणी कपातीची सूचना दिल्याचे सांगितले. याबाबत वरिष्ठ स्तरावर चर्चा सुरू असून लवकरच अंतिम निर्णय जाहीर होण्याची शक्यता आहे.

> पवना धरणातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत आहे. यंदा पाऊस लांबला आहे. त्यामुळे अडचण येऊ शकते. १५ टक्के पाणी कपात करण्याची सूचना महापालिकेस केली आहे. मात्र, त्यांचा प्रतिसाद नाही. पाणी कपातीसंदर्भात वरिष्ठ स्तरावर चर्चा सुरू आहे. चर्चेअंती पाणी कपातीचा निर्णय घेण्यात येईल.
>
> **- रजनीश बारिया, शाखा अभियंता, पवना धरण**

> शहरात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. तूर्त तरी कोणतीही कपात केली जाणार नाही. पावसाचा अंदाज घेऊन पाणी कपातीबाबत पंधरा दिवसांनी आढावा घेतला जाईल. नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा.
>
> **- अजय सूर्यवंशी, सह शहर अभियंता, पाणीपुरवठा विभाग.**



## भूमिका

**भारताच्या विकासाचा वेग वाढवण्यासाठी केंद्र सरकार विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवत आहे. त्यापैकी ग्रेट निकोबार होलिस्टिक डेव्हलपमेंट प्रोजेक्ट हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि चर्चेचा विषय ठरला आहे. सुमारे ८१ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प भारताच्या आर्थिक, व्यापारी आणि सामरिक क्षमतेला नवी दिशा देणारा मानला जात आहे.**

# ग्रेट निकोबार : विकासाच्या महामार्गावर पर्यावरणाचे आव्हान



मात्र, या विकास आराखड्यामुळे पर्यावरण, जैवविविधता आणि स्थानिक आदिवासी समुदायांच्या अस्तित्वासमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अंदमान-निकोबार द्वीपसमूहातील ग्रेट निकोबार बेट हे नैसर्गिक सौंदर्य, घनदाट वर्षावने आणि समृद्ध जैवविविधतेसाठी ओळखले जाते. या बेटाचे स्थानही अत्यंत महत्त्वाचे आहे. जगातील सर्वाधिक वर्दळीच्या सागरी मार्गांपैकी एक असलेल्या मलक्का सामुद्रधुनीजवळ हे बेट स्थित असल्याने त्याला विशेष सामरिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने येथे आंतरराष्ट्रीय कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल, ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ, ऊर्जा प्रकल्प आणि आधुनिक टाउनशिप उभारण्याची योजना आखली आहे. या प्रकल्पामुळे भारताला मोठे आर्थिक लाभ मिळू शकतात. सध्या अनेक मालवाहू जहाजांना कोलंबो किंवा सिंगापूरसारख्या परदेशी बंदरांवर अवलंबून राहावे लागते. ग्रेट निकोबारमध्ये आधुनिक बंदर उभारल्यास भारताची व्यापार क्षमता वाढेल, वाहतूक खर्च कमी होईल आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. तसेच हिंदी महासागर क्षेत्रातील भारताचे सामरिक वर्चस्व अधिक मजबूत होण्यास मदत मिळेल. चीनच्या वाढत्या प्रभावाला तोलून धरण्यासाठीही हा प्रकल्प उपयुक्त ठरू शकतो. परंतु विकासाच्या या चित्राची दुसरी बाजूही चिंताजनक आहे. पर्यावरणतज्ज्ञांच्या मते, प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड होण्याची शक्यता आहे. हजारो वर्षांत विकसित झालेली वर्षावन परिसंस्था नष्ट झाल्यास तिची भरपाई करणे अशक्य ठरेल.

गालथिया उपसागर हा दुर्मीळ लेदरबॅक कासवांच्या प्रजननासाठी जगातील महत्त्वाच्या ठिकाणांपैकी एक आहे. बंदर उभारणी आणि वाढती मानवी हालचाल यामुळे त्यांच्या अस्तित्वावर परिणाम होऊ शकतो. तसेच निकोबार मेगापोड पक्षी, प्रवाळभित्ती आणि अनेक दुर्मीळ जीवसृष्टी धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.याहून गंभीर बाब म्हणजे स्थानिक आदिवासी समुदायांवर होणारा परिणाम. शोम्पेन आणि निकोबारी या जमाती शतकानुशतके या प्रदेशात राहत आहेत. विशेषतः शोम्पेन जमात आधुनिक जगापासून बऱ्याच अंशी अलिप्त राहून पारंपरिक जीवन जगते. मोठ्या प्रमाणावरील बांधकामे, लोकसंख्येची वाढ आणि बाह्य हस्तक्षेप यामुळे त्यांच्या संस्कृतीवर आणि जीवनशैलीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. ग्रेट निकोबार हा भूकंप आणि त्सुनामीच्या दृष्टीने संवेदनशील प्रदेश आहे. २००४ च्या त्सुनामीने या भागाला मोठा फटका बसला होता. त्यामुळे अशा प्रदेशात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारताना सुरक्षिततेच्या निकषांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समन्वय असला पाहिजे.

ग्रेट निकोबार प्रकल्प भारतासाठी संधी निर्माण करणारा ठरू शकतो, परंतु त्यासाठी पर्यावरणीय संतुलन, आदिवासी हक्क आणि शाश्वत विकास या घटकांकडे दुर्लक्ष करता कामा नये. आर्थिक प्रगतीसोबत निसर्गाचे संवर्धन हेच खऱ्या अर्थाने दूरदृष्टीचे विकास मॉडेल ठरेल. अशा संतुलित दृष्टिकोनातूनच ग्रेट निकोबारचा विकास देशासाठी आदर्श ठरू शकतो.

## प्रासंगिक »

### लालसेपायी जीव गेला

**जय आणि विजय हे दोन जिवलग मित्र उत्तम पोहणारे होते. एके दिवशी ते नदीत पोहत होते. अचानक धरणातून पाणी सोडण्यात येणार असल्याची सूचना मिळाल्याने दोघेही किनाऱ्यावर आले.**

काही वेळातच नदीला प्रचंड वेग आला. नदीच्या प्रवाहात एक घोंगडी तरंगत येताना दिसली. ती मिळविण्याच्या लालसेने विजयने नदीत उडी मारली. जयने त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला, पण विजय ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. तो घोंगडीपर्यंत पोहोचला; मात्र वाढत्या प्रवाहामुळे त्याचे संतुलन बिघडले. तो किनाऱ्याकडे परतण्याचा प्रयत्न करू लागला, पण पाण्याच्या प्रचंड लाटा त्याला अधिकाधिक दूर नेत होत्या.

मित्राला संकटात पाहून जय ओरडला, "घोंगडी सोड आणि परत ये!" त्यावर विजय म्हणाला, "मी तिला सोडण्याचा प्रयत्न करतो आहे; पण आता तीच मला सोडत नाही!" वस्तुतः घोंगडी नव्हे, तर तिच्याबद्दलची लालसा त्याला जखडून ठेवत होती. शेवटी घोंगडी वाचविण्याच्या नादात विजय प्रवाहात वाहून गेला आणि त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

- तात्पर्य : **कोणत्याही प्रकारची लालसा प्रसंगी आपल्या जीवाशी खेळू शकते.**

मध्य-पूर्वेतील होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा एकदा जागतिक चिंतेचे केंद्र बनली आहे. अमेरिकेचे अपाचे हेलिकॉप्टर इराणी ड्रोनने पाडल्याच्या घटनेनंतर अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव अधिक तीव्र झाला आहे.

# होर्मुझमधील तणाव : तेल, व्यापार आणि शांततेपुढे आव्हान




त्यानंतर झालेल्या हल्ले-प्रतिहल्ल्यांनी एप्रिलमधील युद्धविराम किती नाजूक होता, हे स्पष्ट केले आहे. सध्या परिस्थिती पूर्ण युद्धाच्या उंबरठ्यावर नसली तरी कोणतीही छोटी चूक मोठ्या संघर्षाला निमंत्रण देऊ शकते. फेब्रुवारी २०२६ पासून अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे संपूर्ण मध्य-पूर्व अस्थिर झाली आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवरील नियंत्रण अधिक कडक केले, तर अमेरिकेने इराणी बंदरांवर दबाव वाढविला. दरम्यान, इस्रायल आणि इराण समर्थित गटांमधील संघर्षही सुरूच आहे. परिणामी, शांततेच्या प्रयत्नांना वारंवार धक्का बसत आहे. होर्मुझ सामुद्रधुनीचे महत्त्व लक्षात घेतले तर या संघर्षाचे परिणाम केवळ संबंधित देशांपुरते मर्यादित राहत नाहीत. जगातील सुमारे २० टक्के कच्चे तेल या मार्गाने वाहतूक होते. त्यामुळे या प्रदेशातील कोणतीही अस्थिरता थेट जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम करते. तेलाच्या किंमती वाढतात, महागाईचा दबाव निर्माण होतो आणि व्यापार व्यवस्थेत अनिश्चितता वाढते. भारतासाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. देशाच्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी बहुतांश तेल आयात केले जाते. होर्मुझमधील संकटामुळे तेल पुरवठा विस्कळीत झाल्यास इंधन दरवाढ, रुपयावरील दबाव आणि महागाईची समस्या अधिक गंभीर होऊ शकते. उद्योग, वाहतूक आणि शेती क्षेत्रावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे.या संघर्षामागे केवळ लष्करी नव्हे तर राजकीय कारणेही आहेत. अमेरिकेतील अंतर्गत राजकारण, इस्रायलच्या नेतृत्वावरील दबाव आणि इराणमधील सत्तासंतुलन यामुळे कोणतीही बाजू माघार घेण्यास तयार दिसत नाही. मात्र पूर्ण युद्ध कोणाच्याही हिताचे नाही. अशा संघर्षात इराणचे मोठे नुकसान होईल, पण त्याचबरोबर अमेरिकेचा आखातातील प्रभाव आणि जागतिक आर्थिक स्थैर्यालाही धक्का बसेल. याचा फायदा चीन आणि रशियासारख्या प्रतिस्पर्धी शक्तींना होऊ शकतो. युद्धाची आग पेटविणे सोपे असते; ती विझविणे कठीण असते. त्यामुळे होर्मुझमधील तणावावर तोडगा काढण्यासाठी संयम, संवाद आणि प्रभावी मुत्सद्देगिरीची गरज आहे. जगाला आज आणखी एका विनाशकारी संघर्षाची नव्हे, तर शांततेची आवश्यकता आहे. होर्मुझमधील धग वेळेत विझवली नाही, तर त्याची झळ संपूर्ण जगाला बसल्याशिवाय राहणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥धृ.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप खपवून घेणार नाही

## पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा इशारा

**महाईन्यूज । अलिबाग**

**राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा आज (११ जून) मुंबईत वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडला आहे. राष्ट्रवादी पक्षाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत पक्षाच्या पुढील वाटचालीबाबत भाष्य केलं. मात्र, भाषणाला सुरूवात करताच सुनेत्रा पवार या अजित पवार यांच्या आठवणीने भावुक झाल्या. 'आज अजित पवार आपल्यात नाहीत', असं म्हणत सुनेत्रा पवार यांना भाषणादरम्यान गहिवरून आलं होतं.**



पुढे बोलताना सुनेत्रा पवार यांनी सूचक इशारा दिला. 'आजपर्यंत सर्वांना समजून घेतलं, पण यापुढे कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असल्यास विचार केला जाईल', असं भाष्य सुनेत्रा पवार यांनी केलं आहे.

"शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. अजित पवार यांच्या कामाची पद्धत कोणालाही नवीन नव्हती. अजित पवार यांनी राज्याच्या प्रगतीसाठी सातत्याने संघर्ष केला. शेतकरी, युवक, महिला, उद्योजक, वंचित घटक अशा सर्वांना न्याय मिळावा, यासाठी अजित पवार यांनी प्रयत्न केले. अजित पवारांनी नेहमीच विकासाला प्राधान्य दिलं. त्यांनी लोकहितासाठी काम केलं. अजितदादा आज आपल्यात नसले तरी त्यांचे विचार नेहमी मार्गदर्शक ठरतील. राष्ट्रवादीला बळकटी देऊन पुढे नेण्याचा दादांचा संकल्प असायचा. त्यांचा हाच संकल्प आपल्याला पुढे घेऊन जायचं आहे", असं सुनेत्रा पवारांनी म्हटलं आहे.

"अजित पवार यांची जागा कोणीही घेऊ शकणार नाही. हे वास्तव आहे. मात्र, अजित पवार यांनी दाखवलेला विकासाचा मार्ग आणि सर्वसामान्य माणसांसाठी त्यांची बांधिलकी हीच आपल्या पक्षाची सर्वात मोठी ताकद आहे. यावर माझा विश्वास आहे. अजित पवार यांच्या पाश्चात राष्ट्रवादी पक्ष माझ्या पाठीशी एक कुटुंब म्हणून उभा राहिला, याची मला जाणीव आणि अभिमान देखील आहे. याची जबाबदारी किती मोठी आहे हे देखील मला माहिती आहे", असंही त्या म्हणाल्या आहेत.

### सुनेत्रा पवारांचा मोठा इशारा

"योग्यवेळी प्रत्येकाला न्याय आणि संधी मिळेल याची खात्री मी देते. आतापर्यंत पक्षात जे घडलं, त्याबाबत प्रत्येकवेळी मी सर्वांना समजून आणि सावरून घेतलं. अजित पवार यांनी त्यांच्या हयातीत सर्व कार्यकर्त्यांना खूप समजून घेतलं. सर्वांचे हट्ट पुरवले, प्रेम केलं, मानसन्मान केला, पदे दिली. अजित पवार यांनी त्यांच्या प्रयत्नाने सर्वकाही देण्याचा प्रयत्न केला. यापुढे मी पक्षाच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देईल. कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप असेल तर नक्की विचार केला जाईल. अजित पवार ज्या प्रमाणे पक्ष हितासाठी कठोर निर्णय घेत होते, त्या प्रमाणे खरं तर माझ्या स्वभावाप्रमाणे ते मला जड जाईल.

“ पुढे बोलताना सुनेत्रा पवार यांनी सूचक इशारा दिला. 'आजपर्यंत सर्वांना समजून घेतलं, पण यापुढे कुणाचाही अनावश्यक हस्तक्षेप होत असल्यास विचार केला जाईल', असं भाष्य सुनेत्रा पवार यांनी केलं आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या सुसंस्कृत राजकारणाचा वारसा आपल्याला सर्वांनाच लाभलेला आहे. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊनच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष पुढील वाटचाल करत आहे. अजित पवार यांना जो महाराष्ट्र अपेक्षित होता, तसा महाराष्ट्र उभा करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता कटिबद्ध राहील असा मला विश्वास आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची राष्ट्रवादीची विचारधारा पुढे घेऊन जाणं याचाच अर्थ सर्वांना बरोबर घेऊन जाणं आहे. देशाचा स्वातंत्र्य लढा असेल किंवा संयुक्त महाराष्ट्राचं आंदोलन असेल, येथील प्रत्येक तळागाळातील प्रत्येक घटकांनी यासाठी मोलाचं योगदान दिलेलं आहे.

**- सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य.**

# एसटी कर्मचाऱ्यांसाठी खुषखबर! : महागाई भत्ता ५८ टक्क्यांवर

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सुमारे ८६ हजार कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रतापराव सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची ऐतिहासिक घोषणा केली. यासोबतच कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्त्यात देखील वाढ करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.**



मुंबई सेंट्रल येथील 'वाहतूक भवन' या महामंडळाच्या मुख्यालयात आज राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही घोषणा करण्यात आली. यावेळी विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या आर्थिक व प्रशासकीय मागण्यांवर सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली.

बैठकीच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे सर्व कर्मचारी संघटनांना शुभेच्छा देताना, "सामंजस्याची भूमिका घेऊन महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करावे," असे आवाहन केले.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत, भविष्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू होताच तो तात्काळ प्रभावाने एसटी कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. तसेच वेतनवाढीची थकबाकीही आर्थिक परिस्थितीचा विचार करून टप्प्याटप्प्याने अदा केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. त्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या सोबत एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांची बैठक आयोजित करण्यात येईल असे देखील ग्वाही दिली.

### महामंडळाच्या आधुनिकीकरणा वर भर

महामंडळाच्या आधुनिकीकरणा वर भर देताना त्यांनी सांगितले की, आतापर्यंत जवळपास साडेतीन हजार नवीन बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली २०३५ पर्यंत एसटीचा ताफा १०० टक्के इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी राज्यभर आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### मंत्री सरनाईकांनी प्रशासनाला कार्यवाहीचे दिले निर्देश

बैठकीत कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवाशर्ती, रिक्त पदभरती, बसस्थानक विकास, कल्याणकारी योजना तसेच महामंडळाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही देत मंत्री सरनाईक यांनी प्रशासनाला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले. महामंडळाच्या सर्व संघटनांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी असलेली समिती तातडीने स्थापन करण्यात यावी.

# होर्मुझ सामुद्रधुनी अमेरिकेच्या नियंत्रणात?

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा खळबळजनक दावा; पश्चिम आशियामध्ये युद्धाचा भडका

**महाईन्यूज । अमेरिका**

**होर्मुझ सामुद्रधुनीवर आता अमेरिकेचे नियंत्रण आहे असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी बुधवारी (१० जून) केला. मात्र, इराणने अमेरिकेचा दावा फेटाळला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणारी सागरी वाहतूक रोखण्याचा अधिकार अजूनही आपल्याकडे आहे, असे इराणने म्हटले आहे. पर्शियन आखात (गल्फ) आणि ओमानचे आखात यांच्या दरम्यान होर्मुझ सामुद्रधुनी आहे. आखाती देशांना महासागराकडे जाण्यासाठी होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडणे हा एकमेव मार्ग आहे.**



जागतिक तेल पुरवठ्याच्या जवळपास २० टक्के तेल वाहतूक याच मार्गाने होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर या मार्गाला महत्व आहे. होर्मुझ सामुद्रधुनीची रूंदी खूपच कमी आहे. सर्वात अरुंद ठिकाणी या सामुद्रधुनीची रुंदी केवळ ३३ किलोमीटरच्या आसपास आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत तेलवाहू जहाजांसाठी निश्चित करण्यात आलेला वाहतूक मार्ग तर याहूनही अधिक अरुंद आहेत. दुहेरी असलेला जलमार्ग प्रत्येकी सुमारे दोन मैल रुंद आहे. त्यातच येणाऱ्या आणि जाणाऱ्या वाहतुकीला वेगळे करणारा एक बफर झोन (सुरक्षित क्षेत्र) देखील आहे.

अमेरिकेचे लष्कर तेलवाहू जहाजांना संरक्षण पुरवत आहे. त्यामुळे इराणच्या धमक्या व मार्ग बंद करण्याच्या घोषणेनंतरही या मार्गिकेतून वाहतूक सुरू आहे, असा दावा ट्रम्प प्रशासनाने केला आहे. १० जून रोजी ट्रम्प यांनी होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी राबवण्यात आलेल्या एका गोपनीय लष्करी मोहिमेची माहिती जाहीर केली.

'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करताना ट्रम्प यांनी लिहिले, "गेल्या महिन्यात, मी आमच्या महान अमेरिकन सैन्याला होर्मुझच्या सामुद्रधुनीतून तेलवाहू जहाजे आणि इतर व्यावसायिक जहाजांना सुरक्षित मार्ग देण्यासाठी एक गुप्त मोहीम राबवण्याचे निर्देश दिले होते. आज मला हे जाहीर करताना आनंद होतो की, या प्रयत्नांमुळे १०० दशलक्ष (१० कोटी) बॅरल्सपेक्षा जास्त कच्चे तेल या सामुद्रधुनीतून खुल्या बाजारपेठेत पोहोचले आहे. २०० हून अधिक तेलवाहू जहाजांनी या सामुद्रधुनीतून सुरक्षित प्रवास केला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीवर अमेरिकेचे नियंत्रण आहे, म्हणूनच हे यश मिळाले. इराणचे सैन्य पराभूत झाले आहे आणि त्यांची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली आहे. इराणचा खेळ संपला आहे!"

ते पुढे म्हणाले, "याबद्दल कोणालाच माहिती नाही. इराणलाही आतापर्यंत हे माहीत नव्हते! आम्ही परवा रात्री उशिरा २२ तेलवाहू जहाजे बाहेर काढली, कारण इराणकडे रडार नाही. आम्ही त्यांची दाणादाण उडवून दिली. आता इराणला हे समजल्यामुळे मी तुम्हाला सांगतोय. इतके दिवस शांत राहणे माझ्यासाठी खूप कठीण होते. मला हे सांगण्याची तीव्र इच्छा होती. हे सर्व संपल्यावर, तेलाचे दर पूर्वीसारखेच खाली आलेले तुम्हाला पाहायला मिळतील.

फ्लोरिडातील टॅंपा येथील 'युएस सेंट्रल कमांड'च्या मुख्यालयाबाहेर बोलताना हेगसेथ यांनी ट्रम्प यांच्या भूमिकेचे समर्थन केले. हेगसेथ यांनी स्पष्ट केले की, 'प्रोजेक्ट फ्रीडम'शी संबंधित लष्करी मोहीम अविरतपणे सुरूच होती. "होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी 'प्रोजेक्ट फ्रीडम' ही मोहीम कधीही थांबली नव्हती. ती फक्त गुप्तपणे सुरू होती. राष्ट्राध्यक्षांनी जाहीर केल्याप्रमाणे, आम्ही होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेलवाहू जहाजांचे रक्षण केले आहे."

हेगसेथ पुढे म्हणाले, "आमची नाकेबंदी अभेद्य आहे. आम्ही कालच होर्मुझ सामुद्रधुनीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करणारे एक तेलवाहू जहाज निकामी केले आहे. आम्ही नाकाबंदी करून जवळपास १४० जहाजे रोखली आहेत. जर आपली नाकेबंदी अभेद्य आहे.

### इराणने अमेरिकेचा दावा का फेटाळला?

होर्मुझ सामुद्रधुनी तेलवाहू जहाजांसह सर्व प्रकारच्या सागरी वाहतुकीसाठी बंद करण्यात आली आहे, असे इराणच्या IRGC ने सांगितले. अमेरिकेने दक्षिण इराणमधील 'बंदर अब्बास' आणि 'केशम बेटा'च्या आजूबाजूच्या रडार केंद्रांवर, हवाई संरक्षण यंत्रणांवर (एअर डिफेन्स) आणि नौदलाच्या तळांवर सलग दोन रात्री केलेल्या लष्करी हल्ल्यानंतर इराणने स्पष्टीकरण दिले आहे. इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांच्या अहवालानुसार, बंदीचा आदेश असतानाही या जलमार्गातून प्रवास करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन जहाजांवर इराणी सैन्याने यापूर्वीच गोळीबार केला आहे.

# पंतप्रधान मोदी अन् कॉक्रोच पार्टीच्या दिपकेंची भेट? संजय राऊत यांचा दावा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वाखाली ६ जून रोजी दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन करण्यात आलं. त्यानंतर आज (११ जून) पुण्यात आंदोलन करण्यात येत आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.**



या आंदोलनात हजारो तरूण सहभाग होत आहेत.

दरम्यान, अभिजीत दिपके यांच्याबाबत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक मोठा दावा केला आहे. पंतप्रधान मोदी आणि 'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दिपके यांची अमेरिकेत भेट झाल्याचा दावा संजय राऊत यांनी केला. त्यांच्या या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आल्याचं पाहायला मिळालं आहे.

तसेच संजय राऊत यांनी या संदर्भात एक फोटो देखील सोशल मीडियावर शेअर केला आहे. दरम्यान, संजय राऊत यांनी केलेल्या दाव्याबाबत आता अभिजीत दिपके यांनी खुलासा केला आहे. 'संजय राऊत यांचा गैरसमज झाला असावा, पण पंतप्रधान मोदींना मी कधीही भेटलो नाही', असं अभिजीत दिपके यांनी टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटलं आहे.

### 'संजय राऊतांचा बहुतेक गैरसमज झाला असावा...'

"मला वाटतं खासदार संजय राऊत यांचा काहीतरी गैरसमज झाला असावा. पण हे खरं आहे की आजपर्यंत मी पंतप्रधान मोदींना कधीही भेटलेलो नाही. मी खूप छोटा व्यक्ती आहे, मग देशाच्या पंतप्रधानांना कसा भेटणार?", असं अभिजीत दिपके यांनी म्हटलं आहे.



"पंतप्रधान मोदी आणि माझी कोणतीही भेट झालेली नाही. माझ्या आणि त्यांच्या भेटीचं कनेक्शन कुठून आलं? मला वाटतं तो फोटो एआय (ARTIFICIAL INTELIGENCE) चा वापर करून बनवलेला असेल. मी अद्याप तो फोटो पाहिलेला नाही. मात्र, माझी आजपर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी कधीही आणि कसली ही भेट झालेली नाही"

- अभिजीत दिपके, संस्थापक, कोकरोच जनता पार्टी.

# वडिलांच्या आठवणीत प्रियांका चोप्रा भावूक





बॉलिवूडपासून हॉलिवूडपर्यंत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी अभिनेत्री प्रियांका चोप्रा पुन्हा एकदा भावूक झाली आहे. तिचे वडील डॉ. अशोक चोप्रा यांच्या पुण्यतिथीनिमित्त तिने सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रियांकाचे वडील डॉ. अशोक चोप्रा हे भारतीय सैन्यात सर्जन म्हणून कार्यरत होते आणि लेफ्टनंट कर्नल पदावरून निवृत्त झाले होते. 10 जून 2013 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रियांकाने काही खास आणि यापूर्वी न पाहिलेले फोटो सोशल मीडियावरील तिच्या इंन्स्टाग्राम अकाऊंटवरुन चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. या फोटोंतील एका फोटोत प्रियांका आणि तिचे वडील एकत्र नृत्य करताना दिसत आहेत, तर दुसऱ्या फोटोत बालपणीची प्रियांका वडिलांच्या मांडीवर बसलेली दिसत आहे. या आठवणींना उजाळा देताना तिने लिहिले, "आम्ही नेहमी एकत्र नाचायचो. बाबा, मला तुमची खूप आठवण येते. तुम्ही कायम माझ्यासोबत आहात. प्रत्येक क्षणी, प्रत्येक निर्णयात तुमची साथ मला जाणवते. लव्ह यू." असे भावूक शब्द तिने पोस्टमध्ये लिहिले आहेत. प्रियांकाने वडिलांच्या स्मरणार्थ आपल्या मनगटावर 'Daddy's Little Girl' असा टॅटूही गोंदवून घेतला आहे. विशेष म्हणजे तिने गोंदवून घेतलेला टॅटू वडिलांच्या हस्ताक्षरात आहे, यातूनच तिचे त्यांच्यावरील प्रेम आणि जिव्हाळा स्पष्टपणे दिसून येतो. दरम्यान, प्रियांकाच्या कामाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास ती लवकरच भारतीय चित्रपटसृष्टीत पुनरागमन करणार आहे.



## रवीना टंडनलला 'मोहरा' चित्रपटाची आठवण

अभिनेत्री रवीना टंडन आणि अक्षय कुमार यांची जोडी २२ वर्षांनंतर पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. हे दोन्ही कलाकार 'वेलकम टू द जंगल' चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात त्यांच्यासोबत सुनील शेट्टी देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. नुकतेच रवीनाने 'वेलकम टू द जंगल'च्या शूटिंगच्या सेटवरील काही फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या फोटोमध्ये रवीना मध्यभागी उभी असून अक्षय आणि सुनील तिच्या दोन्ही बाजूला उभे आहेत. रवीनाने दोघांचे हात पकडले आहेत. या तिघांचा फोटो पाहून अनेकांना १९९४ मधील त्यांचा ब्लॉकबस्टर चित्रपट 'मोहरा' चित्रपटाची आठवण झाली. या तिघांनी 'मोहरा'( Mohara) चित्रपटात एकत्र काम केले होते. हा फोटो देखील त्यांनी 'मोहरा' चित्रपटातील आयकॉनिक फोटोसारखाच हुबेहूब रीक्रिएट केला आहे. तोही फोटो तिने शेअर केला आहे. हा फोटो शेअर करत रवीनाने कॅप्शनमध्ये लिहिले, 'वेलकम टू द जंगल... वेलकम टू द फन अँड गोलमाल. उद्याच्या ट्रेलर लॉन्चसाठी सर्वांना ऑल द बेस्ट! मी या सोहळ्याला खूप मिस करेन. लंडनहून तुम्हा सर्वांसाठी खूप खूप प्रेम. (हा कदाचित पार्ट २ चा टायटल असू शकतो.)' या पोस्टवर अभिनेत्री दिशा पाटनीने कमेंट करत लिहिले, "आम्ही तुम्हाला खूप मिस करू. प्लीज लवकर परत या." रवीनाने शेअर केलेल्या इतर फोटोंमध्ये दिशा पाटनी आणि जॅकलिन फर्नांडिस देखील तिच्यासोबत पोझ देताना दिसत आहेत. या चित्रपटाचा अधिकृत ट्रेलर गुरुवारी रिलीज होणार आहे. मात्र, रवीनाने आपल्या पोस्टमधून हे स्पष्ट केले आहे की, ती सध्या लंडनमध्ये असल्यामुळे ट्रेलर लॉन्चच्या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकणार नाही. चाहते या चित्रपटाच्या ट्रेलरची आतुरतेने वाट पाहत आहेत. अहमद खान यांच्या दिग्दर्शनाखाली बनलेला हा चित्रपट २६ जून रोजी चित्रपटगृहात रिलीज होणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, रवीना टंडन आणि सुनील शेट्टी यांच्यासोबतच संजय दत्त, दिशा पाटनी, जॅकलिन फर्नांडिस, अर्शद वारसी, तुषार कपूर, परेश रावल, जॉनी लिव्हर, राहुल देव, राजपाल यादव, श्रेयस तळपदे, आफताब शिवदासानी आणि कीकू शारदा यांसारख्या कलाकारांची मोठी फौज पाहायला मिळणार आहे.




## जॅकलिन फर्नांडिसच्या सुनावणीत नेमकं काय घडलं?



किमान २०० कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंग प्रकरणात आपल्यावर आरोप निश्चित करण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या बॉलिवूड अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिसच्या याचिकेवरील सुनावणीतून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रशांत कुमार मिश्रा यांनी गुरुवारी माघार घेतली. न्या. मिश्रा आणि न्या. अतुल एस. चंदुरकर यांच्या खंडपीठाने अभिनेत्रीचे वकील आणि अंमलबजावणी संचालनालयाला सांगितले की, हे प्रकरण दुसऱ्या खंडपीठाकडे पाठवले जाईल. गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरू झाली तेव्हा न्या. मिश्रा यांनी सांगितले की, ते या प्रकरणाची सुनावणी करू शकत नाहीत कारण त्यांचा मुलगा आदित्य मिश्रा या प्रकरणाशी संबंधित एका प्रकरणात सरकारी बाजूने उपस्थित राहिला होता. संबंधित प्रकरणांपैकी एका प्रकरणात माझा मुलगा सरकारी बाजूने उपस्थित राहिला होता. हे प्रकरण २५ जून रोजी अशा खंडपीठासमोर ठेवा ज्यामध्ये आमच्यापैकी कोणीही सदस्य नसेल, असे सांगत न्यायमूर्ती मिश्रा यांनी सुनावणीतून माघार घेतली. न्या. मिश्रा यांनी खंडपीठातून माघार घेतल्यामुळे, आता हे प्रकरण २५ जून रोजी त्यांच्या समावेशाशिवाय असलेल्या खंडपीठासमोर सूचीबद्ध केले जाईल. सर्वोच्च न्यायालयाची नोंदणी शाखा (रजिस्ट्री) योग्य खंडपीठाकडे हे प्रकरण सोपवण्यासाठी सरन्यायाधीशांसमोर ते सादर करेल. आता या प्रकरणाकडे २५ जून रोजी होणाऱ्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, जॅकलिन फर्नांडिसच्या याचिकेवर नव्या खंडपीठासमोर पुढील सुनावणी होणार आहे.

# भारतीय क्रिकेटमध्ये पुन्हा ‘द्रविड पर्वा’ला सुरूवात!

## माजी कर्णधार राहुल द्रविड यांच्या धाकट्या लेकाचा भारत U19 संघात समावेश

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतीय संघात पुन्हा एकदा द्रविड पर्वाला सुरू झाली आहे. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत राहुल द्रविड यांचा लेक अन्वय द्रविड याने भारतीय क्रिकेट विश्वात दाखल झाला आहे. राहुल द्रविड यांचा मुलगा अन्वय द्रविड याची भारताच्या अंडर-१९ संघात निवड करण्यात आली आहे. बीसीसीआयने आज जाहीर केलेल्या अंडर-१९ संघात त्याची निवड करण्यात आली आहे.**



भारताचे माजी कर्णधार आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा धाकटा मुलगा अन्वय द्रविड याची आगामी श्रीलंका दौऱ्यासाठी भारताच्या १९ वर्षांखालील संघात निवड करण्यात आली आहे. ४ जुलैपासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यात तीन एकदिवसीय आणि दोन बहुदिवसीय सामने खेळवले जाणार आहेत. कनिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष एस शरथ यांनी संघाची घोषणा केली.

यशवर्धन सिंह चौहान याच्याकडे दोन्ही संघांचे कर्णधारपद सोपवण्यात आले असून, अन्वयची व्हाईट-बॉल संघात निवड झाली आहे. १७ वर्षे आणि ४५ दिवसांचा असताना अन्वय यापूर्वीही भारताच्या १९ वर्षांखालील संघाचा भाग राहिला होता. मागील विश्वचषकाच्या तयारीदरम्यान तो इंडिया ब्लू संघाकडून तिरंगी मालिकेत खेळला होता, मात्र त्याला केवळ एका सामन्यात संधी मिळाली होती.

वयाचा निकष त्याच्या बाजूने असल्याने पुढील विश्वचषक चक्रासाठी त्याचा विचार होणार हे जवळपास निश्चित मानलं जात होतं. आता नव्या विश्वचषक चक्राची सुरुवात होत असताना त्याची श्रीलंका दौऱ्यासाठी निवड झाली असून, पात्रतेचे निकष पूर्ण केल्यास पुढील १९ वर्षांखालील विश्वचषकातही त्याला खेळण्याची संधी मिळू शकते. गेल्या वर्षीच्या विनू मांकड ट्रॉफी स्पर्धेत अन्वयने कर्नाटक संघाचं नेतृत्व करत संघाला उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल मारून दिली होती. सहा सामन्यांत त्याने २२० धावा केल्या. त्यात नाबाद ८२ धावांची सर्वोत्तम खेळी आणि एका अर्धशतकाचा समावेश होता. कर्नाटकने गट टप्प्यातील पाचपैकी चार सामने जिंकून दुसरे स्थान मिळवले होते. मात्र उपांत्यपूर्व फेरीत गतविजेत्या हैदराबाद संघाकडून त्यांचा पराभव झाला.

हिमाचल प्रदेशविरुद्धच्या सामन्यात चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अन्वयने ९३ चेंडूत ८२ धावांची नाबाद खेळी करत कर्नाटकला २३६ धावांचे लक्ष्य गाठून दिले होते. या खेळीत त्याने ६ चौकार आणि २ षटकार लगावले होते. तर गट फेरीत चंदीगडविरुद्धच्या पराभव झालेल्या सामन्यात त्याने ७५ चेंडूत ६३ धावांची खेळी साकारली होती.

याआधी २०२४ मध्ये राहुल द्रविड यांचा मोठा मुलगा समित द्रविड याची ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या घरच्या मैदानावरील द्विपक्षीय मालिकेसाठी भारताच्या १९ वर्षांखालील संघात निवड झाली होती. ही मालिका पुदुच्चेरी आणि चेन्नई येथे खेळवण्यात आली होती. मात्र दुखापतीमुळे समितला त्या मालिकेत खेळता आलं नव्हतं. आता द्रविड कुटुंबातील धाकटा मुलगा अन्वयला भारताच्या १९ वर्षांखालील संघात संधी मिळाली आहे.



### भारताचा १९ वर्षांखालील एकदिवसीय संघ:

सागर विर्क, लक्ष्य रायचंदानी (उपकर्णधार), यशवर्धन सिंह चौहान (कर्णधार), विनीत व्ही.के., अर्जुन राजपूत, कुशाग्र ओझा, रजत बघेल (यष्टिरक्षक), अन्वय द्रविड (यष्टिरक्षक), अनमोलजीत सिंग, वुटकुरी यशवीर गौड, रोहित अनिल यादव, शाविन व्ही., काव्य परेश पटेल, मोहित उल्वा आणि ईशान सूद.

# बेन स्टोक्स-गस ॲटकिन्सन इंग्लंड कसोटी संघातून ड्रॉप

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**न्यूझीलंडविरूद्ध दुसऱ्या कसोटी सामन्याकरता इंग्लंड क्रिकेट बोर्डाने संघ जाहीर केला आहे. १७ जूनपासून सुरू होणाऱ्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी इंग्लंड संघात मोठा बदल करण्यात आला आहे. लंडनमधील केनिंग्टन ओव्हल येथे होणाऱ्या या सामन्यात इंग्लंड संघावर सर्वांच्या नजरा असतील, कारण संघाने इंग्लंडच्या संघात मोठे बदल केले, बेन स्टोक्स व गस ॲटकिन्सन यांना संघाबाहेर केलं आहे.**



### न्यूझीलंडविरुद्धच्या ओव्हल कसोटीसाठी इंग्लंडचा संघ :

जो रूट (कर्णधार), रेहान अहमद, जोफ्रा आर्चर, सनी बेकर, शोएब बशीर, जेकब बेथेल, हॅरी ब्रूक, जॉर्डन कॉक्स, बेन डकेट, मॅथ्यू फिशर, एमिलिओ गे, जेम्स रेव, ऑली रॉबिन्सन, जेमी स्मिथ (यष्टीरक्षक), जोश टंग.

इंग्लंड क्रिकेट बोर्डाने (ECB) न्यूझीलंडविरुद्धच्या सुरू असलेल्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यासाठी संघ जाहीर केला आहे. पहिल्या सामन्यानंतर घडलेल्या एका नाईटक्लबमधील घटनेमुळे, इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्स आणि पहिल्या सामन्यात उत्कृष्ट गोलंदाजी करणारा वेगवान गोलंदाज गस ॲटकिन्सन यांना या सामन्यातून वगळण्यात आलं आहे. ईसीबीने (ECB) दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी संघाचा अनुभवी खेळाडू जो रूट याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी सोपवली आहे.

लॉर्ड्स कसोटी सामना संपल्यानंतर चेल्सीमधील एका नाईटक्लबमध्ये बेन स्टोक्स आणि गस ॲटकिन्सन हे वादात अडकले होते. नाईट क्लबमधील रग्बी प्लेअरबरोबर झालेल्या वादाची सध्या चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे केवळ स्टोक्सचे कर्णधारपदच नव्हे, तर त्याची संपूर्ण कारकीर्दही संपुष्टात येऊ शकते, अशी चर्चा जोर धरू लागली आहे. हे प्रकरण संघाची शिस्त आणि ‘कर्फ्यू’च्या (वेळेच्या निर्बंधांचे) उल्लंघनाशी संबंधित असल्याचे ईसीबीने (ECB) स्पष्ट केलं असून, घटनेच्या सर्व पैलूंची सखोल चौकशी केल्यानंतरच यावर निर्णय घेतला जाईल.

‘द ओव्हल’ येथे १७ जूनपासून सुरू होणाऱ्या न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी इंग्लंडने बेन स्टोक्स आणि गस ॲटकिन्सन यांना संघातून वगळलं आहे, तर वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर आणि जॉर्डन कॉक्स यांचा संघात समावेश केला आहे. आर्चर ११ जून रोजी इंग्लंडला परतणार असून, ‘ॲशेस’ मालिकेनंतर तो पहिल्यांदाच कसोटी सामना खेळताना दिसणार आहे. तो या सामन्यात खेळणार की नाही हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही, कारण त्याच्या वर्कलोड मॅनेजमेंट विचारात घेतला जाईल. दरम्यान, यापूर्वी दीर्घकाळ कर्णधारपद भूषवलेल्या जो रूटने २०१७ ते २०२४ या काळात इंग्लंडचे विक्रमी ६४ कसोटी सामन्यांत नेतृत्व केलं.

स्मार्ट PCMC
SMART CITY

# महाईन्यूज

ePaper
। शुक्रवार ।
दि. 12 जून 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## २४ तास मेडिकल स्टोअर्सबाहेर रात्री युवकांची गर्दी; चौकशीची मागणी

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

शहरातील निगडी, प्राधिकरण, रुपीनगर, आकुर्डी, चिंचवड, वायसीएम रुग्णालय परिसरासह विविध भागांतील काही २४ तास सुरू असलेल्या मेडिकल स्टोअर्सबाहेर रात्री उशिरापर्यंत युवकांची गर्दी होत असल्याचे चित्र दिसत आहे. औषधांसोबतच शीतपेये, आईस्क्रीम, चिप्स, कुरकुरे, चॉकलेट आणि इतर खाद्यपदार्थांची विक्री होत असल्याने या ठिकाणी मध्यरात्रीपर्यंत वर्दळ कायम राहत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

### मेडिकल की रात्रीचे अड्डे?

२४ तास सुरू असलेल्या काही मेडिकल स्टोअर्सबाहेर मध्यरात्रीपर्यंत युवकांची गर्दी होत असल्याने स्थानिक नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. औषधांपेक्षा शीतपेये, चिप्स व इतर खाद्यपदार्थांच्या खरेदीसाठीच ही वर्दळ वाढत असल्याची चर्चा असून संबंधित यंत्रणांनी याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

शहरातील बहुतांश टपऱ्या, खाद्यपदार्थ विक्रेते आणि लहान हॉटेल व्यवसाय रात्री १० वाजेपर्यंत बंद होत असताना काही मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध असलेल्या खाद्यपदार्थांमुळे ग्राहकांची ये-जा सुरूच राहते. अनेक ठिकाणी मेडिकल स्टोअर्ससमोर दुचाकींच्या रांगा लागत असून युवकांचे घोळके आणि गप्पांचे अड्डे रंगत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना औषधे उपलब्ध व्हावीत, या उद्देशाने २४ तास मेडिकल सेवा सुरू ठेवण्यात येते. मात्र रात्री उशिरापर्यंत दिसणारी गर्दी ही औषध खरेदीसाठी असते की इतर वस्तूंसाठी, असा प्रश्न स्थानिक रहिवासी उपस्थित करत आहेत. काही भागांत या गर्दीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणे, ध्वनिप्रदूषण वाढणे आणि सुरक्षेच्या समस्या निर्माण होत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. नागरिकांच्या मते, रात्री पोलिसांची गस्त सुरू असली तरी काही ठिकाणच्या गर्दीकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याचे दिसते. त्यामुळे पोलिस प्रशासनाने वस्तुस्थितीची पडताळणी करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे

तसेच मेडिकल स्टोअर्समध्ये विक्री होणाऱ्या खाद्यपदार्थांसाठी आवश्यक परवानग्या, अन्न सुरक्षा नियमांचे पालन आणि रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या गर्दीवर नियंत्रण याबाबत पोलिस प्रशासन, अन्न व औषध प्रशासन आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने संयुक्तपणे पाहणी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.





AI generated image

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*




**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# मालमत्ताकर संकलनाला जोर!

## मालमत्ता कर भरताना 10 टक्के सवलतीचा लाभ घेण्यासाठी अवघे २० दिवस बाकी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये मालमत्ता कर संकलन मोहिमेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मालमत्ता करावरील १० टक्के सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता अवघे २० दिवस शिल्लक राहिले आहेत. ३० जून २०२६ पूर्वी ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करावर १० टक्के सवलत देण्यात येत आहे. अद्याप ज्या मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तो तात्काळ भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.**



महापालिकेकडून ३० जून २०२६ पूर्वी मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. विशेषतः ऑनलाइन माध्यमातून कर भरणाऱ्या नागरिकांना सामान्य करावर १० टक्क्यांपर्यंत सवलत मिळत असल्याने डिजिटल व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली आहे. १ एप्रिल २०२६ ते १० जून २०२६ या कालावधीत २ लाख ९४ हजार ९७१ मालमत्ताधारकांनी कर भरला असून, त्यापैकी ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या २ लाख ६४ हजार २४१ एवढी आहे. ऑनलाइन माध्यमातून आतापर्यंत ३१५ कोटी ६० लाख रुपयांहून अधिक कर संकलित झाला आहे.

शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र वापराच्या मालमत्ता तसेच मोकळ्या जागांसह एकूण ७ लाख ४४ हजार ६३० नोंदणीकृत मालमत्ता आहेत. सर्व मालमत्ताधारकांना वेळेत कर देयके मिळावीत यासाठी महिला बचत गटांच्या माध्यमातून घरपोच मालमत्ता कर बिल वाटप मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली आहे. तरीही अद्याप ज्या मालमत्ताधारकांनी कर भरला नाही, त्यांनी तो तात्काळ भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



“ पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल सेवा देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मालमत्ता कर हा शहराच्या विकासाचा महत्त्वाचा आर्थिक स्रोत असून, नागरिकांनी वेळेत कर भरल्यास शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होते. मालमत्ता करावरील सवलतीचा लाभ घेण्यासाठी आता शेवटचे २० दिवस शिल्लक असून, नागरिकांनी ३० जून २०२६ पूर्वी कर भरून उपलब्ध सवलतींचा लाभ घ्यावा.

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# २२ हजार ९०६ मालमत्ताधारकांच्या शास्तीचे होणार समायोजन

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील २०२३ पूर्वी झालेल्या अनधिकृत बांधकामांना लावण्यात आलेला शास्तीकर राज्य सरकारने माफ केल्यानंतर आतापर्यंत ९६ कोटी १२ लाख रूपयांचे समायोजन केले आहे. २०२६-२७ या वर्षात २२ हजार ९०६ मालमत्ता धारकांच्या रक्कमेचेही मालमत्ता करामध्ये समायोजन करण्यास बुधवारी (दि.१०) स्थायी समितीने मान्यता दिली आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामांना २०१२-१३ पासून शास्तीकर वसूल केला जात होता. ३ मार्च २०२३ रोजी राज्य शासनाने शहरातील अनधिकृत बांधकामांचा शास्तीकर माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ३ मार्च २०२३ पूर्वी झालेल्या २५ हजार ६७३ अनधिकृत बांधकामांना याचा लाभ मिळाला. या मालमत्ता धारकांनी शास्तीकराची २६० कोटी ५३ लाख रूपयांची रक्कम महापालिकेकडे जमा केली होती.

शास्ती कर माफीचा निर्णय झाल्यानंतर २०२३-२४ मध्ये २२ हजार ५१२ मालमत्ता धारकांना ३० कोटी ३ लाख, २०२४-२५ मध्ये २५ हजार ६७३ मालमत्ता धारकांना ३५ कोटी ९५ लाख, २०२५-२६ मध्ये २१ हजार ८२४ मालमत्ता धारकांना ३० कोटी १४ लाख असे ९६ कोटी १२ लाख रूपयांची रक्कम मालमत्ता करामध्ये समायोजित केली. त्यानंतरही २२ हजार ९०६ मालमत्ता धारकांची १६४ कोटी ४१ लाख रूपयांची रक्कम मालमत्ता करामध्ये समायोजित करणे बाकी आहे. त्यानुसार २०२६-२७ या आर्थिक वर्षात १६४ कोटी ४१ लाखांपैकी जेवढी शक्य आहे, त्यानुसार ती रक्कम समायोजित केली जाणार आहे. या समायोजनाला स्थायी समितीने बुधवारी मान्यता दिल्याची माहिती कर आकारणी व कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी दिली.




“ शहरातील २५ हजार ६७३ मालमत्ता धारकांनी प्रामाणिकपणे शास्तीकर भरून मालमत्ता कर महापालिकेकडे जमा केला होता. राज्य सरकारने २०23 मध्ये शास्तीकर माफीचा निर्णय घेतला. त्यामुळे शास्तीकर भरलेल्या नागरिकांची रक्कम २०२३-२४ पासून त्यांच्या मालमत्ता करातून समायोजित केली जात आहे. आतापर्यंत २६० कोटी ५३ लाखापैकी ९६ कोटी १२ लाख रूपये समायोजन केले आहे. चालू आर्थिक वर्षात २२ हजार ९०६ मालमत्ता धारकांनी कर भरू नये. त्यांची आगाऊ भरलेली रक्कम मालमत्ता करात समायोजित केली जाणार आहे.

**- अभिषेक बारणे, अध्यक्ष, स्थायी समिती.**

“ अनधिकृत बांधकाम धारकांच्या बिलामध्ये शास्ती कराचे समायोजन केले जात आहे. ही रक्कम मोठी असल्यामुळे एका वर्षात समायोजन होऊ शकत नाही. दरवर्षी मालमत्ता धारकांच्या बिलानुसार समायोजन केले जात आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षात २२ हजार ९०६ मालमत्ता धारकांच्या रक्कमेचे समायोजन केले जाणार आहे. महापालिकेकडे १६४ कोटी ४१ लाख रूपये समायोजन करणे बाकी आहे. ही रक्कम टप्पा-टप्पाने दरवर्षी समायोजित केली जात आहे.

**- तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त पिंपरी चिंचवड महापालिका.**

# ‘ट्राफिक बडी’ला उत्स्फूर्त प्रतिसाद

## मे महिन्यात १,३६५ वाहतूक तक्रारींचा २४ तासांत निपटारा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढती संख्या आणि त्यातून निर्माण होणाऱ्या वाहतूक समस्यांवर प्रभावी उपाय म्हणून पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने सुरू केलेला ‘ट्राफिक बडी’ हा ऑनलाइन व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट नागरिकांसाठी उपयुक्त ठरत आहे. मे २०२६ या एका महिन्यात या माध्यमातून प्राप्त झालेल्या तब्बल १,३६५ तक्रारींचा यशस्वी निपटारा करण्यात आल्याची माहिती वाहतूक विभागाने दिली आहे.**






पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात राज्यासह देशभरातून रोजगार, व्यवसाय आणि शिक्षणासाठी नागरिक स्थायिक होत आहेत. शहराच्या झपाट्याने होणाऱ्या विकासामुळे दुचाकी व चारचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, वाहतूक कोंडी व विविध वाहतूकविषयक समस्या निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारींचे जलद निराकरण करण्यासाठी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या आदेशानुसार, पोलीस सहआयुक्त शशीकांत महावरकर आणि अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ‘ट्राफिक बडी’ हा व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

या चॅटबॉटच्या माध्यमातून नागरिकांना वाहतूक नियमांचे उल्लंघन, वाहतूक कोंडी, वाहतूक व्यवस्थेतील अनियमितता, खराब रस्ते, बेकायदेशीर पार्किंग, ट्रॅफिक सिग्नलमधील बिघाड, वाहतूकविषयक सूचना तसेच जड-अवजड वाहनांकडून होणारे नियमभंग अशा विविध विषयांवरील तक्रारी फोटोसह नोंदविता येतात.

तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित विभागामार्फत तिचे निराकरण २४ तासांच्या आत करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच तक्रारीवर झालेल्या कारवाईची माहिती तक्रारदाराला संदेशाद्वारे तत्काळ कळविण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे, वाहतूक व्यवस्थापनात नागरिकांचा सहभाग वाढावा यासाठी ‘ट्राफिक बडी’वर स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. यामुळे वाहतूक समस्या ओळखणे आणि त्यावर तत्काळ उपाययोजना करणे अधिक सुलभ होत असल्याचे वाहतूक विभागाचे म्हणणे आहे.

मे २०२६ या महिन्यात ट्राफिक बडीवर आलेल्या एकूण १,३६५ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून, या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

वाहतूक पोलीस विभागाने पिंपरी-चिंचवडकरांना आवाहन केले आहे की, वाहतूक कोंडी, वाहतूक नियमन आणि इतर वाहतूकविषयक समस्या सोडविण्यासाठी ‘ट्राफिक बडी’ व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट क्रमांक ८७८८६४९८८५ चा जास्तीत जास्त वापर करावा.

# मोशीत भरधाव कंटेनरची ॲक्टिव्हाला धडक; महिलेचा मृत्यू

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी येथील इंडियन ऑइल काजळे पेट्रोल पंपाजवळ भरधाव कंटेनरने ॲक्टिव्हा दुचाकीला धडक दिल्याने एका महिलेचा मृत्यू तर एका व्यक्तीचा हात गंभीर जखमी होऊन निकामी झाल्याची दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पांडुरंग एकनाथ कुचेकर (वय ३५, रा. खंडेवस्ती, भोसरी) यांनी फिर्याद दिली आहे. दि. १० जून रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास मोशी येथील इंडियन ऑइल काजळे पेट्रोल पंपाजवळ हा अपघात झाला.

कंटेनर क्रमांक NL 01 AD 2845 वरील चालक सुंदर पंढरीनाथ गवळी (वय २६, रा. दिघी, पुणे) याने वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवत ॲक्टिव्हा (MH 14 FB 9112) ला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील सविता दयानंद कांबळे (वय ३०) यांचा मृत्यू झाला, तर दुसरे प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांचा उजवा हात निकामी झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अपघातानंतर कंटेनर चालकाविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू आहे. पुढील तपास एमआयडीसी भोसरी पोलीस करीत आहेत.



# प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे रेबीज जनजागृती सत्राचे आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे विद्यार्थी व पालकांसाठी रेबीज जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र मिशन रेबीजचे प्रशिक्षक श्री. आबिद यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. सत्रामध्ये रेबीज हा आजार कसा पसरतो, त्याची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय तसेच प्राणी चावल्यास तात्काळ कोणती काळजी घ्यावी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच भटक्या कुत्र्यांशी सुरक्षितपणे कसे वागावे याचेही मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थी व पालकांनी उत्साहाने सहभाग घेत विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

या उपक्रमामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये रेबीजबाबत जागरूकता निर्माण झाली तसेच आरोग्य व सुरक्षिततेसंबंधी महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. शाळेच्या प्राचार्या श्रीमती आशा रेड्डी यांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा जनजागृती कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या वतीने मिशन रेबीजचे प्रशिक्षक श्री. आबिद यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
BLOOD
DONATION
DRIVE
Saturday, 13 June 2026
TIME: 09:30 AM - 12:30 PM
LOCATION: SCHOOL CAMPUS
O
A
AB